StudentBounty.com

निरीक्षक प्रमाणित शास्त्र व संस्था, सा. रा. से., -

# A

2010

Code :

परीक्षा दि. ३१/१०/२०१०

प्रश्नपुस्तिका क्रमांक
**BOOKLET No.**

No. 134

## प्रश्नपुस्तिका

एकूण प्रश्न : 150
एकूण गुण : 150

वेळ : $1\frac{1}{2}$ (दीड) तास

## चाळणी परीक्षा/SCREENING TEST

## सूचना

(1) सदर प्रश्नपुस्तिकेत 150 अनिवार्य प्रश्न आहेत. उमेदवारांनी प्रश्नांची उत्तरे लिहिण्यास सुरुवात करण्यापूर्वी या प्रश्नपुस्तिकेत सर्व प्रश्न आहेत किंवा नाहीत याची खात्री करून घ्यावी. असा तसेच अन्य काही दोष आढळल्यास ही प्रश्नपुस्तिका समवेक्षकांकडून लगेच बदलून घ्यावी.

(2) आपला परीक्षा-क्रमांक ह्या चौकोनांत **न विसरता बॉलपेनने** लिहावा.

| परीक्षा-क्रमांक | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|

केंद्राची संकेताक्षरे ... शेवटचा अंक

(3) वर छापलेला प्रश्नपुस्तिका क्रमांक तुमच्या उत्तरपत्रिकेवर विशिष्ट जागी उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे **न विसरता नमूद करावा.**

(4) या प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाला 4 पर्यायी उत्तरे सुचविली असून त्यांना 1, 2, 3 आणि 4 असे क्रमांक दिलेले आहेत. त्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तराचा क्रमांक उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे तुमच्या उत्तरपत्रिकेवर नमूद करावा. अशा प्रकारे उत्तरपत्रिकेवर उत्तरक्रमांक नमूद करताना तो संबंधित प्रश्नक्रमांकासमोर छायांकित करून दर्शविला जाईल याची काळजी घ्यावी. **ह्याकरिता फक्त काळ्या शाईचे बॉलपेन वापरावे, पेन्सिल वा शाईचे पेन वापरू नये.**

(5) सर्व प्रश्नांना समान गुण आहेत. यास्तव सर्व प्रश्नांची उत्तरे द्यावीत. घाईमुळे चुका होणार नाहीत याची दक्षता घेऊनच शक्य तितक्या वेगाने प्रश्न सोडवावेत. क्रमाने प्रश्न सोडविणे श्रेयस्कर आहे पण **एखादा प्रश्न कठीण वाटल्यास त्यावर वेळ न घालविता पुढील प्रश्नाकडे वळावे.** अशा प्रकारे शेवटच्या प्रश्नापर्यंत पोहोचल्यानंतर वेळ शिल्लक राहिल्यास कठीण म्हणून वगळलेल्या प्रश्नांकडे परतणे सोईस्कर ठरेल.

(6) उत्तरपत्रिकेत एकदा नमूद केलेले उत्तर खोडता येणार नाही. नमूद केलेले उत्तर खोडून नव्याने उत्तर दिल्यास ते तपासले जाणार नाही.

(7) **प्रस्तुत परीक्षेच्या उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन करताना उमेदवाराच्या उत्तरपत्रिकेतील योग्य उत्तरांनाच गुण दिले जातील. तसेच "उमेदवाराने वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरूपाच्या प्रश्नांची अचूक उत्तरेच उत्तरपत्रिकेत नमूद करावीत. अन्यथा त्यांच्या उत्तरपत्रिकेत सोडविलेल्या प्रत्येक चार चुकीच्या उत्तरांसाठी एका प्रश्नाचे गुण वजा करण्यात येतील".**

**पर्यवेक्षकांच्या सूचनेविना हे सील उघडू नये**

## ताकीद

**ह्या प्रश्नपत्रिकेसाठी आयोगाने विहित केलेली वेळ संपेपर्यंत ही प्रश्नपुस्तिका आयोगाची मालमत्ता असून ती परीक्षाकक्षात उमेदवाराला परीक्षेसाठी वापरण्यास देण्यात येत आहे. ही वेळ संपेपर्यंत सदर प्रश्नपुस्तिकेची प्रत/प्रती, किंवा सदर प्रश्नपुस्तिकेतील काही आशय कोणत्याही स्वरूपात प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे कोणत्याही व्यक्तीस पुरविणे, तसेच प्रसिद्ध करणे हा गुन्हा असून अशी कृती करणाऱ्या व्यक्तीवर शासनाने जारी केलेल्या "परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारांना प्रतिबंध करण्याबाबतचा अधिनियम-82" यातील तरतुदीनुसार तसेच प्रचलित कायद्याच्या तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती कमाल एक वर्षाच्या कारावासाच्या आणि/किंवा रुपये एक हजार रकमेच्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.**

**तसेच ह्या प्रश्नपत्रिकेसाठी विहित केलेली वेळ संपण्याआधी ही प्रश्नपुस्तिका अनधिकृतपणे बाळगणे हा सुद्धा गुन्हा असून तसे करणारी व्यक्ती आयोगाच्या कर्मचारीवृंदापैकी, तसेच परीक्षेच्या पर्यवेक्षकीयवृंदापैकी असली तरीही अशा व्यक्तीविरूद्ध उक्त अधिनियमानुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती शिक्षेस पात्र होईल.**

**पुढील सूचना प्रश्नपुस्तिकेच्या अंतिम पृष्ठावर पहा**

www.StudentBounty.com

कच्च्या कामासाठी जागा

StudentBounty.com

www.StudentBounty.com

StudentBounty.com

1. जास्तीत जास्त उचित पर्याय निवडा.

वैयक्तिक पातळीवरून कोणत्याही घटकाचे प्रदूषण होऊ नये यासाठी दक्ष रहायचे असेल तर प्रत्येकाने स्वतःला पुढीलपैकी कोणता प्रश्न विचारणे योग्य होणार नाही ?

(1) एखादी कृती करणे अत्यावश्यक आहे काय ? का ?

(2) ही कृती करताना कोणकोणत्या पर्यावरणीय घटकांवर कोणत्या स्वरूपाचा परिणाम होणार आहे याचा विचार मी केला आहे काय ?

(3) एवढा सर्व विचार केवळ मीच करणे आवश्यक आहे काय ?

(4) एखादी कृती करण्यासाठी ऊर्जा व्यय कमी होईल या दृष्टीने दक्ष रहाण्याचे कोणते पर्याय मला उपलब्ध आहेत ?

---

2. वाक्यपूर्तीच्या दृष्टीने कोणता पर्याय अनुचित आहे ?

संगणकीय सुविधांच्या क्रांतीमुळे विद्यार्थ्यांना ________ .

(1) स्वतःच्या बुद्धिमत्ता कलानुसार शैलीनुसार ज्ञानरचना करणे शक्य झाले आहे.

(2) स्वाध्याय व गृहपाठ पुरे करण्यासाठी नक्कल करणे सोपे झाले आहे.

(3) प्रतिभासी अनुभव घेऊन सखोल आकलन प्राप्त करणे सुलभ झाले आहे.

(4) अध्ययनशील समूहात सामील होऊन आवडीच्या विषयाचा व्यासंग जोपासणे सहज शक्य झाले आहे.

---

3. विद्यार्थ्यांच्या अध्ययन प्रक्रियेचा निकषाधारित नोंद करण्याचा तक्ता म्हणजे ...........

(1) प्रश्नावली (2) अनुसूची

(3) निरीक्षणपत्रक (4) शोधिका

---

**पुढील उतारा वाचून 4 ते 8 पर्यंतच्या सर्व प्रश्नांसाठी जास्तीत जास्त उचित पर्याय निवडा.**

जॉन रस्किन यांच्या 'अनटू धिस लास्ट' या पुस्तकातील चौथ्या प्रकरणाचे शीर्षक 'मूल्यनिदान' असे आहे. या प्रकरणात 'उपयुक्त' या शब्दाची व्याख्या करताना रस्किन यांनी म्हटले आहे, की एखादी वस्तू उपयुक्त ठरावयाची असेल तर, केवळ तिच्या अंगी उपयुक्तता हा गुण असून चालणार नाही, तर तिचा सदुपयोग करणाऱ्याच्या हातीच ती असली पहिजे. त्यांच्या मते सदुपयोग करू शकणाऱ्या हातातील मूल्यवान वस्तू म्हणजे संपत्ती होय. श्रमांबद्दलच्या विवेचनामध्ये रस्किन यांनी विधायक श्रमांना, सर्वोत्तम स्थान दिले आहे. शेतीमध्ये केलेले श्रम विधायक असतात. युद्धातील श्रम विध्वंसक असतात, त्याचप्रमाणे रत्नाला पैलू पाडण्याचे श्रम हे लोकातील आचरट वृत्तीला व अहंकाराला चालना देणारे असल्यामुळे ते हानीकारक च ठरतात... अपत्य संगोपनाचे काम सर्वात स्तुत्य मानले, तर दुसऱ्या टोकाला खून करण्याचे काम निंद्य व तिरस्करणीय असते हे लक्षात ठेवूनच, विधायक श्रमांना महत्त्व देऊन, विध्वंसक श्रम त्याज्य मानले पाहिजेत. रस्किन म्हणतात की, अर्थशास्त्राचा अंतिम उद्देश चांगल्या प्रकारच्या सुखाचा उपभोग घेण्यास शिकवणे हा असून, उपभोगाचा उद्देश व परिणाम जीवन हाच असला पाहिजे. जीवन या शब्दाचे विवेचन करताना रस्किन यांनी लिहिले आहे. 'जीवन या शब्दामध्ये प्रेम, आनंद, कौतुक आदी सर्व शक्तींचा मी समावेश करतो. ज्या देशात उदात्त व आनंदी मानवांची जास्तीत जास्त संख्या नांदत असते, तोच देश सर्वात अधिक समृद्ध होय; तसेच आपल्या जीवनाच्या सर्व शक्तींचा विकास करताना आपल्या शीलाने व इतरांच्या जीवनाचा विकास करतो तोच खरा श्रीमंत माणूस होय.'

---

**कच्च्या कामासाठी जागा**

P.T.O.

www.StudentBounty.com

StudentBounty.com

**4.** रस्किन यांच्या मते वस्तू तेव्हाच उपयोगी ठरते जेव्हा ती तिचा सदुपयोग करणाऱ्याच्या हाती असे... ज्ञानयुगात ''ज्ञान'' ही महत्त्वाची वस्तू आहे. हे ज्ञान तेव्हाच उपयोगी ठरेल जेव्हा त्याच्या साहाय्याने...

(1) स्वतःला सुख देणाऱ्या वस्तू मिळवेल.
(2) स्वतः मुक्त राहील व इतरांना मुक्त रहाण्यास साहाय्य करील.
(3) एखादे उच्च पद मिळवून लोकांना उपकृत करील.
(4) वरील सर्व.

---

**5.** रस्किन यांच्या मते सदुपयोग करू शकणाऱ्याच्या हाती असणारी मौल्यवान वस्तू म्हणजे संपत्ती होय. या दृष्टीने पाहिल्यास ..........

(1) वर वर क्षुल्लक वाटणाऱ्या वस्तूचा वा कौशल्याचा उपयोग करून, व्यक्ती त्याचे मूल्य वाढवू शकते.
(2) व्यक्तीकडे जर एखाद्या गोष्टीचा सदुपयोग करण्याचे कौशल्य नसेल, तर ती गोष्ट तिच्या हाती कवडीमोल ठरेल.
(3) व्यक्तीकडे विविध गोष्टींचा (ज्ञान, वस्तू, कौशल्य) सदुपयोग करणे, म्हणजे काय याचे ज्ञान हवे.
(4) विधाने 1, 2 व 3 योग्य.

---

**6.** रस्किन यांच्या मते रत्नाला पैलू पाडण्याचे श्रम हानीकारक ठरतात कारण ते माणसांच्या आचरटपणाला चालना देतात. याचा अर्थ

(1) पैलू पाडलेल्या रत्नाचा उपयोग एखाद्या विधायक कार्यासाठी होणार असेल तर ते श्रम विधायक ठरतील.
(2) व्यक्तींकडून रत्नांचा सदुपयोग केला जात नसल्याने ती कवडीमोल ठरतात.
(3) रत्ने मौल्यवान असली तरी त्याचे प्रदर्शन करणे हा त्यांचा सदुपयोग ठरत नाही.
(4) वरील सर्व अर्थ योग्य.

---

**7.** अपत्य संगोपनाला रस्किन स्तुत्य श्रम मानतात कारण ..........

(1) अपत्यांचे योग्य संगोपन झाले, तर देशातील आनंदी व उदात्त माणसांची संख्या वाढेल.
(2) अपत्यांचे योग्य संगोपन झाल्यास, देशातील खऱ्या श्रीमंतांची संख्या वाढेल.
(3) अपत्यांचे योग्य संगोपन झाल्यास, त्यांना गोष्टीचा सदुपयोग म्हणजे काय हे समजेल.
(4) वरील सर्व.

---

**8.** रस्किन यांचे विचार ..........

(1) कालोचित नाहीत कारण अधिकाधिक संपत्तीची हाव, व्यक्तीला महत्त्वाकांक्षी बनवते व त्यातून देशाचा विकास होतो.
(2) कालोचित आहेत कारण ते दैन्य व द्रारिद्र्याची प्रशंसा न करता, सर्वांसाठी चांगल्या सुखोपभोगाचा आग्रह धरतात.
(3) कालोचित आहेत कारण त्यातून उपदेश मिळतो.
(4) कालोचित नाहीत कारण स्वतःचा वाटा मिळवण्यासाठी हानिकारक व विध्वंसक श्रम करण्याशिवाय, व्यक्तीला पर्याय नसतो.

---

**कच्च्या कामासाठी जागा**

www.StudentBounty.com

StudentBounty.com

**9.** वाक्यपूर्तीसाठी जास्तीत जास्त योग्य पर्याय निवडा.

विद्यार्थ्याला स्वतःच्या अध्ययन प्रक्रियेच्या नोंदी ठेवून, त्यावर विमर्शी चिंतन करण्याचे कौशल्य प्राप्त करायला मदत दिली तर त्याचा उपयोग __________ .

(1) विद्यार्थ्याच्या वैशिष्ट्यांचे मूल्यमापन करण्यासाठी होतो.
(2) स्वतःच्या अध्ययन वाटचालीचे परीक्षण करण्याची संधी देऊन विद्यार्थ्याला स्वतःच्या विकासाचा मार्ग आखायला मदत देण्यासाठी होतो.
(3) विद्यार्थ्याला स्वतःच्या वर्तनातील त्रुटींचे, स्वयंमूल्यमापन करायला मदत देता येते.
(4) वरील सर्व.

---

**10.** जास्तीत जास्त उचित पर्याय निवडा.

वेब क्वेस्ट (जाल-शोध) या विद्यार्थीकेंद्री अध्ययन सुविधेत, ____________ .

(1) अध्यापक विद्यार्थ्यांपुढे काही समस्या ठेवून, आंतरजालाच्या मदतीने तिचे निराकरण करायला सांगतात.
(2) अध्यापक विद्यार्थ्यांना, संगणकीय व आंतरजाल सुविधांमार्फत विविध अध्ययन स्रोत उपलब्ध करून देतात, त्यांच्या मदतीने विद्यार्थ्यांनी सहभागाने विशिष्ट सूत्राधारे (Theme), अस्सल अध्ययनकृती करायच्या असतात.
(3) विद्यार्थ्यांना स्वाध्याय करणे सोपे जावे म्हणून, अध्यापक आदर्श नमुने तयार करून, ते आंतरजाला मार्फत उपलब्ध करतात.
(4) परीक्षेला येणाऱ्या प्रश्नांची आदर्श उत्तरे व अंतर्गत मूल्यमापनासाठी, करायची सादरीकरणे यांचे आदर्श नमुने संगणकामार्फत उपलब्ध करतात.

---

**11.** वाक्यपूर्तीसाठी उचित पर्याय निवडा.

ज्ञानरचना उपागमानुसार विद्यार्थ्यांच्या विकासाचे मूल्यमापन हे त्याने _________ .

(1) केलेल्या अध्ययनप्रक्रिया नोंदी, समूह अध्ययनात दिलेला सहभाग, त्याच्या निर्मितीची गुणवत्ता, विद्यार्थ्याचे विमर्शीचिंतन अहवाल यांच्या मदतीने केले जाते.
(2) पूर्ण केलेले स्वाध्याय व अंतिम परीक्षा यांच्या मदतीने केले जाते.
(3) संपादन चाचणीत मिळवलेले गुण, सादर केलेले प्रकल्प अहवाल व मुक्त मुलाखतीतील कार्यमान, यांच्या मदतीने केले जाते.
(4) वरील सर्व प्रकारच्या पद्धतींनी केले जाते.

---

**12.** जास्तीत जास्त योग्य पर्याय निवडा.

रावी ला तिच्या विषयातील एका मूलभूत संकल्पनेची निर्मिती व विकास कसा होतो, याचा शोध घ्यायचा आहे. तर त्यासाठी तिने कोणत्या पद्धतींचा अवलंब करून आधारसामग्री गोळा करावी.

(1) विद्यार्थ्यांना त्या संकल्पनेशी निगडित मुक्त अंत स्वरूपाच्या कृती करायला सांगून, ते त्यासाठी कसा विचार करत आहेत, याचा शोध प्रश्नांच्या आधारे मागोवा घ्यावा.
(2) नेहमीच्या शालेय परीक्षेतून शोध घ्यावा.
(3) विद्यार्थ्यांना संबंधित संकल्पनेविषयीचे त्यांचे आकलन स्पष्ट करायला लावून, त्याचे विश्लेषण करावे.
(4) पहिल्या व तिसऱ्या मुद्दयातील कृती आवश्यक.

---

**कच्च्या कामासाठी जागा**



www.StudentBounty.com

StudentBounty.com

**13.** विधानपूर्तीसाठी जास्तीत जास्त योग्य पर्याय निवडा.

निरंतर अध्ययनासाठी व्यक्ती सक्षम व्हायची असेल तर ________ .

(1) तिची शाब्दिक संदेश विसांकेतीकरणक्षमता वाढवणे उचित ठरेल कारण बहुतेक वेळा, संप्रेषणा शब्दमाध्यम वापरले जाते.

(2) तिची विभिन्न माध्यमे व मार्गांनी येणारा संदेश स्वतःसाठी अर्थपूर्ण करण्याची क्षमता वाढवावी लागेल.

(3) तिला कोणत्याही मार्गाने व माध्यमातून येणारा संदेश, वैयक्तिकरीत्या व सहभागाने अर्थपूर्ण करण्याचे अनुभव घ्यायला शालेय पातळीवरच, मदत द्यावी लागेल.

(4) वरील सर्व उपाय निरूपयोगी आहेत.

---

**14.** कार्यकारणपूर्तीसाठी जास्तीत जास्त योग्य पर्याय निवडा.

मेंदूविषयक अद्यावत संशोधनातून सिद्ध झाले आहे की मेंदू हा समांतर प्रक्रियक आहे. याचा अर्थ असा की ________ .

(1) विचलन वा आंदोलन झाले, तरी काही व्यक्ती आपले काम चांगल्याप्रकारे करू शकतात.

(2) विचलन वा आंदोलन झाले, तरी सर्व व्यक्ती आपले काम चांगल्याप्रकारे करू शकतात.

(3) एकाच वेळी अनेक गोष्टींकडे, अवधान देण्याची क्षमता असणाऱ्या व्यक्ती विचलन वा आंदोलन झाले तरी आपले काम चांगल्या रीतीने करू शकतात.

(4) एकाग्रतेला महत्त्व देण्याची गरज नाही.

---

**15.** जास्तीत जास्त उचित पर्याय निवडा.

पर्यावरण रक्षण व संवर्धन यांचा विचार जागतिक पातळीवरून केला जातो कारण ..........

(1) ही जबाबदारी जगातील सर्व देशांनी उचलायला हवी.

(2) पृथ्वी ही एकात्मिक परिसंस्था आहे.

(3) पर्यावरणाच्या सर्व घटकांत अन्योन्यसंबंध आहे.

(4) विकसनशील देशांचा यातील सहभाग वाढवणे आवश्यक आहे.

---

**16.** प्रकल्पपूर्तीच्या अंतिम टप्प्याला गोळा केलेल्या आधारसामग्रीच्या ..........

(1) आधारे विश्लेषण केले जाते.

(2) विश्लेषणातून उपलब्ध झालेल्या तथ्यांच्या आधारे निष्कर्ष काढले जातात.

(3) आधारे काढलेल्या निष्कर्षांवरून, संपूर्ण प्रकल्पाचे मूल्यमापन केले जाते.

(4) वरीलपैकी सर्व अयोग्य.

---

**कच्च्या कामासाठी जागा**

www.StudentBounty.com

StudentBounty.com

**17.** ए.एन. फ्लँडर्स यांनी केलेल्या वर्गआंतरक्रियाविश्लेषणाचा उपयोग वर्तमान काळात अत्यंत मर्यादित स्वरूप होऊ शकेल कारण ..........

(1) त्याला पंचवीस वर्षांहून अधिक काळ लोटला आहे.

(2) त्यात अध्यापन कार्याला महत्त्व असून अध्ययन कार्याचे स्थान दुय्यम आहे.

(3) अध्यापक काहीतरी करतो, म्हणूनच त्याला प्रतिसाद म्हणून, विद्यार्थी काही तरी करतोच, असे गृहीत धरले आहे.

(4) वरील दुसरा व तिसरा मुद्दा बरोबर.

---

**18.** 1975 मध्ये बेलग्रेड येथे पर्यावरण शिक्षणावर जागतिक परिषद भरविण्यात आली. त्यात पर्यावरण शिक्षणाची पुढीलपैकी कोणती उद्दिष्टे ठरविली हे सांगणाऱ्या विधान संचांतील कोणता संच योग्य आहे ?

अ. पर्यावरणाच्या विविध घटकांबाबत जागरूकता निर्माण करणे.

ब. वृक्षसंवर्धनाचे महत्त्व स्पष्ट करणे.

क. पर्यावरण संवर्धनात व्यक्तीची भूमिका स्पष्ट करणे.

पर्यायी उत्तरे :

(1) अ व ब  (2) ब व क

(3) अ व क  (4) अ, ब व क

---

**19.** वर्तमानात, सतत सर्वंकष मूल्यमापनाच महत्त्वाचे आहे कारण ती ..........

(1) विद्यार्थीकेंद्री स्वरूपाची प्रक्रिया आहे.

(2) व्यक्तिनिष्ठ प्रक्रिया आहे.

(3) सर्वात जास्त विश्वासार्ह व वैध प्रक्रिया आहे.

(4) सोपी प्रक्रिया आहे.

---

**20.** दैनंदिन शालेय कामकाजात येणाऱ्या तत्कालिक समस्या दूर करण्यासाठी, तसेच स्वतःची कार्यगुणवत्ता वाढविण्यासाठी, केलेल्या प्रयोगांच्या परिणामकारकतेचा वैज्ञानिक पद्धतीने केलेला अभ्यास म्हणजे __________ होय.

(1) शैक्षणिक संशोधन  (2) मूलभूत संशोधन

(3) शैक्षणिक कृतिसंशोधन  (4) उपयोजित संशोधन

---

**21.** कोणत्याही संगणकास माहिती पुरविणारे व आदेश देणारे __________ हे उपकरण आहे.

(1) मॉनिटर  (2) प्रिंटर

(3) की-बोर्ड  (4) वरील सर्व

---

कच्च्या कामासाठी जागा



www.StudentBounty.com

StudentBounty.com

**22.** कृतिसंशोधनाचे महत्त्वाचे वैशिष्ट्ये म्हणजे ________ .

(1) सूक्ष्म पातळीवर अभ्यास करण्यास मदत करते.

(2) ज्ञाना साठी ज्ञान निर्माण करण्यास मदत करते.

(3) संशोधनाची व्याप्ती व्यापक असते.

(4) ते संशोधनकर्त्याची कार्यगुणवत्ता वाढविण्यास उपयुक्त ठरू शकते.

**23.** अनेक संशोधिका त्यांच्या संशोधनाची व्याप्ती, विशिष्ट भौगोलिक क्षेत्रापुरती मर्यादित करतात. याचा अर्थ ..........

(1) निश्चित केलेल्या आश्रयी चलावर, भौगोलिक क्षेत्र परिणाम करते, असे त्या गृहीत धरतात.

(2) निर्धारित जनसंख्या परिसरविशिष्ट वर्तन करते असे त्या गृहीत धरतात.

(3) त्यांनी निश्चित केलेल्या स्वाश्रयी चलावर भौगोलिक क्षेत्र परिणाम करते असे त्या गृहीत धरतात.

(4) वरील सर्व कारणे शक्य आहेत, शिवाय इतरांच्या संशोधन अहवालांत व्याप्तीत भौगोलिक क्षेत्र लिहिलेले असते म्हणून आपणही ते लिहायला हवे असे त्यांना वाटते.

**24.** बौद्धिक प्रामाणिकतेची कास धरून, कोणतीही संकल्पना, कोणत्याही वयाला शिकण्यासाठी, योग्य वातावरण अध्यापक रचू शकतात, हे ________ यांनी प्रयोगाने सिद्ध केले.

(1) ब्रुनर
(2) डॉ. अरनॉल्ड गिझेल
(3) मॉस्लो
(4) काहेलर

**25.** कोणत्याही संशोधनाचे स्वरूप कृती, उपयोजित वा पायाभूत आहे हे ________ यावर अवलंबून असते.

(1) संबंधित समस्या कोणत्या कारणाने अभ्यासली जात आहे ?

(2) त्या समस्येचा विचार कोणत्या दृष्टिकोनातून केला जात आहे ?

(3) त्या समस्येच्या अभ्यासासाठी कोणती पद्धत अवलंबिली जात आहे ?

(4) समस्येचे स्वरूप काय आहे ?

**26.** पहिल्या टप्प्याला निवडलेल्या न्यादर्शातूनच पुन्हा जर न्यादर्श निवडला गेला तर त्यास ________ म्हणतात.

(1) गुच्छ न्यादर्शन
(2) नियमबद्ध न्यादर्शन
(3) प्रासंगिक न्यादर्शन
(4) बहुस्तरीय न्यादर्शन

**27.** Internet म्हणजे ________ .

(1) इंटरडिव्हिजनल नेटवर्क ऑफ कॉम्प्युटर्स

(2) इंटरनॅशनल नेटवर्क ऑफ कॉम्प्युटर्स

(3) इंटरकनेक्टेड नेटवर्क ऑफ कॉम्प्युटर्स

(4) इंटरनॅशनल नेटवर्क ऑफ सर्व्हर

**कच्च्या कामासाठी जागा**

www.StudentBounty.com

StudentBounty.com

**28.** आय.सी.टी. म्हणजे ________ .

(1) इन्फॉरमेशन अॅन्ड कॉम्प्युटर टेक्नॉलॉजी

(2) इंटर कनेक्टड टेक्नॉलॉजी

(3) इन्फॉरमेशन कॉमन टेक्नॉलॉजी

(4) इन्फॉरमेशन अॅन्ड कम्युनिकेशन टेक्नॉलॉजी

---

**29.** प्रोग्राम व डेटा तात्पुरता साठवून ठेवण्यासाठी ________ चा उपयोग होतो.

(1) RAM (2) ROM (3) CD (4) DVD

---

**30.** जागतिक स्तरावर पर्यावरणदिन साजरा करण्यामागे ________ .

(1) सर्व लोकांना पर्यावरणाची माहिती मिळावी ही अपेक्षा असते.

(2) सर्व लोकांनी पर्यावरणबाबत जागरूक होऊन, पर्यावरण संवर्धन गट स्थापन करून कार्य करावे अशी अपेक्षा असते.

(3) समारंभ करून आनंद लुटावा अशी अपेक्षा असते.

(4) परीक्षेसाठी तो दिवस लक्षात ठेवायला मदत मिळावी ही अपेक्षा असते.

---

**31.** ________ हा भारताचा पहिला भूस्थिर उपग्रह फक्त शैक्षणिक कार्यक्रमासाठी वापरतात.

(1) एज्युसॅट (2) आर्यभट्ट (3) कणाद (4) इस्त्रो

---

**32.** नर्मदा बचाव आंदोलन ________ यासाठी केले जात आहे.

(1) स्थानिक लोकांची प्रगती होऊ नये

(2) परदेशातून सेवापारितोषिके मिळावित म्हणून

(3) बाधित लोक व त्यांचे पुनर्वसन यांचे प्रश्न मांडण्यासाठी

(4) देशाच्या प्रगतीत अडथळा आणण्यासाठी

---

**33.** जळावरण, मृदावरण आणि त्यांच्या भोवतालच्या वातावरणाला ________ पर्यावरण म्हणतात.

(1) नैसर्गिक (2) मानवनिर्मित (3) रासायनिक (4) औद्योगिक

---

**34.** डॉस (DOS) म्हणजे ________ .

(1) डायरेक्ट ऑपरेटिंग सिस्टिम (2) डिस्क ऑपरेटिंग सिस्टिम

(3) डबल ऑपरेटिंग सिस्टिम (4) डेस्क ऑपरेटिंग सिस्टिम

---

**कच्च्या कामासाठी जागा**



www.StudentBounty.com

StudentBounty.com

**35.** खालील रेखांकन कोणत्या अभिकल्पाचे आहे ?

| गट | पूर्वपरीक्षण | उपचार | उत्तर परीक्षण |
|---|---|---|---|
| अ | $O_1$ | × | $O_3$ |
| ब | $O_2$ | | $O_4$ |

(1) केवळ उत्तर परीक्षण नियंत्रित गट अभिकल्प
(2) असमान नियंत्रित गट अभिकल्प
(3) समय मालिका अभिकल्प
(4) प्रतिसंतुलन अभिकल्प

**36.** पर्यावरणाच्या असमतोल निर्मितीतील महत्त्वाचा घटक ________ .
(1) वेगाने होणारे शहरीकरण.
(2) वाढत्या मानवी गरजा आणि सुखचैनीच्या बाबींचा हव्यास.
(3) सामाजिक बांधीळकीची जाणिव नसणे.
(4) वरील सर्व.

**37.** ________ ही मानवनिर्मित परिसंस्था आहे.
(1) वाळवंट
(2) खाडी
(3) शेती
(4) गवताळ प्रदेश

**38.** मूल्यशिक्षणाची विशेष तासिका महाराष्ट्र शासनाने रद्द केली आहे कारण ..........
(1) मूल्यशिक्षण निरुपयोगी ठरत आहे.
(2) मूल्यशिक्षण सर्वविषयांतर्गत एकात्मिक स्वरूपातच होऊ शकते हे संशोधनातून सिद्ध झालेले आहे.
(3) मूल्यशिक्षणाच्या तासिकेला काय करायचे हे समजत नसल्याने मुलांचा वेळ वाया जातो.
(4) आजूबाजूला सर्वत्र भ्रष्टाचार असल्याने शिक्षकांना मूल्य शिकवणे जड जाते.

**39.** कोणत्याही स्वरूपाच्या आपत्तीमुळे होणाऱ्या, सर्व प्रकारच्या हानीचे स्वरूप, अल्प व्हावे म्हणून पुढीलपैकी कोणत्या कृती करणे उचित ठरेल ?
(1) आपत्ती-प्रवण नकाशे तयार करणे.
(2) धोकादायक वस्तूंची ओळख करून देणे.
(3) रासायनिक साठयांची नियमित तपासणी करणे.
(4) वरील सर्व.

**कच्च्या कामासाठी जागा**

www.StudentBounty.com

**40.** पर्यावरणविषयक कायदे मोडले जातात कारण ..........

(1) लोकांना कायदे माहीत नसतात.

(2) लोकांना पर्यावरणाची हानी होते हे माहीत नसते.

(3) धन व अधिकार दांडगाईच्या तसेच राजकीय दांडगाईच्या जोरावर आपण काहीही करू शकतो असे लोकांना वाटते.

(4) गरीब वा श्रीमंत लोकांची, पर्यावरण हानी ही आपल्याजवळ पोहोचणार नाही अशी खात्री असते.

---

**41.** नैसर्गिक व सामाजिक घटनासंबंधीचे ज्ञान मिळविणे, त्याचे स्पष्टीकरण करणे व त्या बाबत भविष्य कथन करणे एवढाच एकांतिक उद्देश ________ असतो.

(1) उपयोजित संशोधनाचा
(2) कृती संशोधनाचा
(3) मूलभूत संशोधनाचा
(4) ऐतिहासिक संशोधनाचा

---

**42.** राज्यातील सर्व शिक्षणावर देखरेख ________ ठेवतो.

(1) शिक्षणमंत्री
(2) शिक्षण संचालक
(3) शिक्षण सचिव
(4) शिक्षण अधिकारी

---

**43.** जिल्ह्यातील सर्व शैक्षणिक कार्यक्रम जिल्ह्यांच्या ________ पार पाडळे जातात.

(1) स्थायी समितीद्वारा
(2) विषय समितीद्वारा
(3) शिक्षण समितीद्वारा
(4) जिल्हा परिषद शिक्षणाधिकारीद्वारा

---

**44.** भारतात व्यावसायिक स्वरूपात मधाची निर्मिती करण्यामुळे होणारा घातक परिणाम म्हणजे ..........

(1) युरोपातील मधमाश्यांचे वाण भारतात आले आहेत. हे भारतीय मधमाश्यांच्या अस्तित्वाला धोकादायक ठरत आहे.

(2) युरोपीय मधमाश्यांना दिली जाणारी रोगप्रतिबंधक औषधे मधात उतरली असून, त्यामुळे मध हे अन्न सर्वांना धोकादायक ठरत आहे.

(3) एक व दोन पर्याय बरोबर.

(4) वरील सर्व गोष्टी म्हणजे मध-व्यावसायिकांची भरभराट न पाहवणाऱ्या लोकांनी उठवलेल्या अफवा आहेत.

---

**45.** शेतकऱ्यांनी रासायनिक खतापेक्षा सेंद्रियखते वापरावी. कारण त्यामुळे ________ प्रदूषण टाळणे शक्य होईल.

(1) जल
(2) सर्व प्रकारचे (हवा, जल, भू व अन्न)
(3) हवा
(4) हवा व भू

---

कच्च्या कामासाठी जागा

P.T.O.

StudentBounty.com
www.StudentBounty.com

StudentBounty.com

**46.** दूरस्थ शिक्षण संस्थेमध्ये औपचारिक शिक्षण संस्थांच्या तुलनेत, मूल्यमापन प्रक्रियेत ______

(1) ताठरता असते.
(2) अधिक लवचीकपणा असते.
(3) पूर्णतः व्यक्तीनिष्ठता असते.
(4) फारसा फरक नसतो.

---

**47.** अनौपचारिक शिक्षणाबाबत योग्य विधान शोधा.

अ. 6 ते 14 वयोगटातील मुलांना शिक्षणाचा लाभ मिळाला नाही अशांसाठी अनौपचारिक शिक्षण.
ब. औपचारिक शिक्षणपद्धती हून वेगळी, परंतु हेतू पूर्ण करणारी आहे.
क. कुटुंब, शेजारी, नातेवाईक या सारख्या व्यक्ती/संस्थाकडून शिक्षण दिले जाते.
ड. अनौपचारिक शिक्षणपद्धतीत कालावधी, अभ्यासक्रम व शिक्षण साहित्य यांना अवाजवी महत्त्व असते.

(1) फक्त अ बरोबर
(2) अ व ब बरोबर
(3) अ, ब, क बरोबर
(4) फक्त ड बरोबर

---

**48.** इंटरनेटच्या वापरामध्ये ______ या संकल्पनांना अत्यंत महत्त्व आहे.

अ. लॉगइन
ब. युजरनेम
क. पासवर्ड

(1) अ व क
(2) ब व क
(3) अ व ब
(4) वरील सर्व

---

**49.** कोणत्याही स्वरूपाच्या शिक्षण पद्धतीत, तसेच कोणत्याही विषयाच्या शिक्षणात, व्यक्तीची ______ गुंतवणूक होणे, अत्यावश्यक आहे.

(1) बोधात्मक
(2) भावात्मक
(3) समग्र
(4) शारीरिक

---

**50.** वर्धा शिक्षण योजना म्हणजेच ______ होय.

(1) सार्जंट योजना
(2) मूलोद्योगी शिक्षण योजना
(3) निरंतर शिक्षण योजना
(4) प्रौढ शिक्षण योजना

---

**51.** अन्न प्रदूषण टाळण्यासाठी ..........

(1) जल व भू-प्रदूषण टाळण्याची खबरदारी घ्यायला हवी.
(2) कीटकनाशके व खतांचा अत्यंत वाजवी प्रमाणात वापर करायला हवा.
(3) अन्न प्रदूषणाला प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षरीत्या कारणीभूत ठरणाऱ्या सर्व घटकांची योग्य प्रकारे विल्हेवाट लावायला हवी.
(4) वरील सर्व.

---

**52.** इ.स. 1986 च्या शैक्षणिक धोरणात प्राथमिक शिक्षकांच्या प्रशिक्षणासाठी ______ स्थापन करण्याची शिफारस करण्यात आली.

(1) जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था
(2) शिक्षण विस्तार सेवा केंद्र
(3) राज्य विज्ञान शिक्षण संस्था
(4) प्रगत शिक्षण संस्था

---

**कच्च्या कामासाठी जागा**

www.StudentBounty.com

StudentBounty.com

**53.** माहिती तंत्रज्ञानात खालील बाबी समाविष्ट असतात.

अ. माहिती मिळवणे.

ब. माहितीवर प्रक्रिया करणे.

क. प्रक्रिया केलेली माहिती साठविणे.

ड. पाहिजे त्याला ती उपलब्ध करून देणे.

(1) अ, ब, क व ड
(2) अ व ड
(3) ब, क व अ
(4) ब व क

---

**54.** विद्यार्थी व शिक्षकामध्ये संप्रेषण परिणामकारक होऊ शकत नाही. याचे कारण ..........

(1) शारीरिक अडथळे
(2) भाषिक अडथळे
(3) भावनिक अडथळे
(4) वरील सर्व अडथळे

---

**55.** माहिती तंत्रज्ञानामध्ये ___________ .

(1) व्यक्तीला माहिती पुरवणे अभिप्रेत असून व्यक्तीत कौशल्ये निर्माण करणे अभिप्रेत नाही.

(2) व्यक्तीला माहिती पुरवणे अभिप्रेत नसून व्यक्तीला कौशल्ये साध्य करण्यास मदत करणे अभिप्रेत आहे.

(3) व्यक्तीला कौशल्ये साध्य करण्यास अभिप्रेत नसून व्यक्तीला प्रयोगाची संधी देणे अभिप्रेत आहे.

(4) यापैकी कोणी नाही.

---

**पुढील उतारा वाचून क्रमांक 56 ते 60 पर्यंतच्या प्रश्नांसाठी जास्तीत जास्त उचित पर्याय निवडा.**

अभ्यास करायला बसायची इच्छा कशी निर्माण केली जाईल याचं एक उदाहरण ऐका. बहुतेकजण लिहायला आळशी असतात. अगदी मोठ-मोठे लेखकसुद्धा लेखनाच्या बाबतीत आळस असणारे होते. नियमित लेखन व्हावं यासाठी एका लेखकानं एक निश्चय केला. सकाळची न्याहरी नऊ वाजता संपवायची आणि त्यानंतर एक वाजेपर्यंत एका ठराविक टेबलखुर्चीवर जाऊन लेखनाचं काम करत बसायचं. लेखन होवो न होवो पण नऊ ते एक जागा सोडायची नाही. सुरवातीला फारसं काही सुचायचं नाही. थोडफार लिहिलं जायचं. पुन्हा ते खोडलं जायचं. पुन्हा कितीतरी वेगळं लिहिलं जायचं. आठवडयाला एक लेख लिहून पुरा होता होता मारामार व्हायची. हळूहळू आठवडयाला एक लेख पुरा व्हायला लागला. काही दिवसांनी त्या जागेवर बसलं की विचार आपोआपच सुचायला लागायचे. आज काय मूड नाही, असले मनाचे फाजील लाड आपोआप बंद झाले. पुढं पुढं या लेखक महाशयांची विचारप्रक्रिया न्याहरी घेतानाच सुरु व्हायची. यापूर्वी जेवणासाठी एक केव्हा वाजतोय हे वारंवार घडयाळात बघणाऱ्या लेखकाचं पुढं वेळेचं भान हरपलं. विशिष्ट वेळ झाल्यावर ठराविक काम करण्याचा असा झटका येण्याची सवय लावून घेणं याला मानसशास्त्रात अभिसंधान (conditioning) पद्धती म्हणतात. तुम्ही अभ्यासाच्या बाबतीत याच पद्धतीचा वापर करा. अभ्यासाची वेळ व ठिकाण निश्चित करा. सुरुवातीला लेखकासारखंच तुम्हाला काही सुचणार नाही. मूड लागत नाही, शेजारी मूल रडतं, पलीकडे मुलं दंगा करतात असली कारणं अभ्यास होऊ नये म्हणून हात जोडून उभी असतात. कोणत्याही परिस्थितीत जागा व प्रयत्न सोडू नका. यात सातत्य ठेवा. हळूहळू तुम्ही अभ्यासाच्या बैठकीवर प्रभुत्व मिळवाल.

---

**कच्च्या कामासाठी जागा**



www.StudentBounty.com

StudentBounty.com

**56.** प्रस्तुत उताऱ्यातून लेखकाने विद्यार्थ्यांना आवाहन करण्यासाठी __________ या मनोवैज्ञानि[…] उपयोग केला आहे.

(1) आंतरिक प्रेरण (2) बाह्य प्रेरण

(3) अभ्यस्त प्रेरण (4) प्रबलन

---

**57.** ठराविक टेबल-खुर्चीवर लेखनाचं काम करायचं हे लेखकाने ठरवलं व त्याप्रमाणे तो अभ्यासबैठक धरून ठेवू लागला. याचा अर्थ ..........

(1) त्याचा आत्मविश्वास दांडगा होता.

(2) त्याची चिकाटी दांडगी होती.

(3) त्याचा उत्साह दांडगा होता.

(4) त्याच्याजवळ प्रबळ इच्छाशक्ती, आत्मविश्वास व चिकाटी होती.

---

**58.** लेखक सुरुवातीला लिहू शकत नव्हता कारण ..........

(1) त्याच्याकडे विचारक्षमता नव्हती.

(2) विचार करण्यासाठी व ते लिहून काढण्यासाठी आवश्यक क्षमता त्याच्याकडे नव्हती.

(3) आळसावर मात करून एकाग्र बैठक करण्याची त्याला सवय नव्हती.

(4) आळसावर मात करून एकाग्र बैठक करण्याची इच्छा त्याला नव्हती.

---

**59.** लेखकाला हळूहळू अभ्यास-बैठक करणे जमू लागले कारण ..........

(1) त्याने विशिष्ट जागी बसून, विशिष्ट कृती करण्याची सवय लावून घेतली.

(2) त्याने विशिष्ट जागी बसून, विशिष्ट कृती करण्याचा सातत्याने सराव केल्याने त्याच्या शरीराला व मनाला अभ्यास-बैठकीची सवय लागली.

(3) त्याला वेळेचे भान राहीना.

(4) न्याहरीच्या वेळी सुचलेले विचार कधी कागदावर उतरवतो असे त्याला होई

---

**60.** लेखकाने चिकाटीने व सातत्याने प्रयत्न करून आळसावर मात केली याचा अर्थ त्याने ..........

(1) स्वतःच्या स्वातंत्र्याचा उपयोग करून, स्वतःच्या मनाला फाजील लाडांच्या गुलामीतून, मुक्त केले.

(2) आळसाच्या गुलामीतून स्वतःला मुक्त केले.

(3) परीक्षेसाठी आवश्यक असे तंत्र आत्मसात करण्यात यश मिळवले.

(4) तो खुर्चीत बसून लिहिण्याच्या सवयीचा गुलाम झाला.

---

**कच्च्या कामासाठी जागा**

www.StudentBounty.com

StudentBounty.com

**61.** सेतुजालाचा उपयोग करून अध्ययनाची गुणवत्ता वाढवणे शक्य होते, याचे प्रमुख कारण म्हणजे ......

(1) प्रचंड प्रमाणात माहिती उपलब्ध होते.

(2) संबंधित समस्येचा अनेक संदर्भात, अनेक दृष्टिकोनातून विचार करण्याला व त्यासंदर्भातले इतरांचे दृष्टिकोन समजून घेण्याला वाव मिळतो.

(3) अद्यावत माहिती उपलब्ध होते.

(4) विद्यार्थी स्वतःच माहिती मिळवून, स्वतःची आदर्श उत्तरे तयार करतो व त्यामुळे अध्यापकाची गरज उरत नाही.

---

**62.** भारतात इंदिरा गांधी मुक्त विद्यापीठ ________ मध्ये दिल्ली येथे स्थापन करण्यात आले.

(1) 1985 (2) 1995 (3) 1976 (4) 1975

---

**63.** सजीवांच्या संदर्भात, पर्यावरणाचे मूलभूत घटक ________ हे आहेत.

(1) पृथ्वी, जल, हवा, चंद्र

(2) पृथ्वी, जल, हवा व तारे

(3) भूमी, जल, हवा व सूर्य

(4) भूमी, जल, हवा, सूर्य व पृथ्वी यातले अंतर

---

**64.** एक किलो बाईट म्हणजे ...........

(1) दोन हजार बिट्स

(2) चार हजार बिट्स

(3) एक हजार बाईट

(4) दोन हजार बाईट

---

**65.** 'समस्या निराकरण पद्धती' ________ यांच्या तत्वमीमांसेवर आधारित आहे.

(1) ड्युई (2) रूसो (3) मॉरिसन (4) प्लेटो

---

**66.** सन 1985 मध्ये दिल्ली येथे 'पर्यावरण शिक्षण' या विषयावर एक परिषद झाली. या वर्षी ________ ने पर्यावरण शिक्षणासंबंधी प्राथमिक शिक्षणाचा अभ्यासक्रम तयार केला.

(1) एन.सी.ई.आर.टी.

(2) एन.सी.टी.ई.

(3) एस.सी.ई.आर.टी.

(4) यु.जी.सी.

---

**67.** आधुनिक मनोवैज्ञानिक तत्वांनुसार, विद्यार्थ्याला, व्यवसाय निवडीसाठी समुपदेशन करतांना, पुढीलपैकी कोणत्या कसोटीचा वा कसोटयांचा वापर करणे उपयुक्त ठरेल ?

(1) व्यवसायासंबंधित कौशल्य कसोटी

(2) बहुविध बुद्धिमत्ता कसोटी

(3) अभिरुची शोधिका व शारीरिक क्षमता कसोटी

(4) वरील सर्व

---

कच्च्या कामासाठी जागा

P.T.O.

www.StudentBounty.com

StudentBounty.com

**68.** वर्गात शिक्षक दोन विद्यार्थ्यांना एकमार्गी व्याख्यान पद्धतीने शिकवितात. इथे शिक्षक कोणते संप्रेषणाचा उपयोग करतात ?

(1) व्यक्ती-समूह या मधील संप्रेषण

(2) व्यक्ती-व्यक्ती या मधील संप्रेषण

(3) समूहांतर्गत संप्रेषण

(4) अर्थपूर्ण शाब्दिक संप्रेषण

---

**69.** नैसर्गिक संकटांमुळे होणाऱ्या जीवित व वित्तहानीचे प्रमाण ________ असलेल्या क्षेत्रात अधिक असते.

(1) लोकसंख्येचे प्रमाणाबाहेर केंद्रीकरण

(2) लोकवस्तीची अनियोजित व अनियंत्रित वाढ

(3) लोकवस्तीची नियोजित व प्रमाणबद्ध वाढ

(4) लोकसंख्येची प्रमाणाबाहेर वाढ

---

**70.** __________ हे पुनर्निर्मितीक्षम नैसर्गिक संसाधन आहे.

(1) सौर ऊर्जा (2) खनिज तेल (3) धातू (4) दगडी कोळसा

---

**71.** स्वतंत्र विचारशक्ती, विद्यार्थ्यांमध्ये परस्पर विचार विनिमय, चर्चा करण्याची पात्रता, सहकार्य, परमतसहिष्णुता; इत्यादी गुणांचा विकास करणे ________ चा प्रमुख उद्दिष्ट होय.

(1) सहभागात्मक अध्ययन पद्धती
(2) घटक-अध्ययन पद्धती
(3) समवाय पद्धती
(4) समालोचन पद्धती

---

**72.** राष्ट्रामधील शिक्षणात एकसूत्रता आणण्यासाठी __________ स्तरावर शैक्षणिक धोरण आखतात.

(1) केंद्रीय
(2) राज्य
(3) जिल्हा
(4) प्रभागीय

---

**73.** nitasamson@gmail.com हा संकेत ________ सुचवितो.

(1) ई-मेल चे ओळख
(2) सर्च इंजिनचे नाव
(3) वेब पेजचे नाव
(4) एक्सप्लोअररचे नाव

---

**74.** चिपको आंदोलन _________ राज्यात घडले.

(1) गुजराथ
(2) राजस्थान
(3) केरळ
(4) महाराष्ट्र

---

**कच्च्या कामासाठी जागा**

www.StudentBounty.com

StudentBounty.com

**75.** सेवांतर्गत प्रशिक्षणासाठी उद्‌बोधन कार्यक्रमाचे आयोजन पुढील कार्यवाहिन्या तर्फे केले जाते.

(1) जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था

(2) एन.सी.ई.आर.टी.

(3) राज्य आंग्लभाषा संस्था, औरंगाबाद

(4) वरील सर्व

---

**76.** एन.सी.टी.ई. (N.C.T.E.) चे प्रमुख उद्दिष्ट कोणते ?

(1) प्रशिक्षण संस्थाना मान्यता देणे.

(2) अभ्यासक्रम व पद्‌धती यांबाबत मार्गदर्शक तत्त्वे घालून देणे.

(3) शिक्षक प्रशिक्षणाच्या गुणवत्तेचा विकास साधणे.

(4) नवीन मूल्यमापन तंत्रे विकसित करणे.

---

**77.** "व्याघ्र" प्रकल्प हाती घेण्याचे मुख्य उद्दिष्ट ________ हे आहे.

(1) वाघांची संख्या वाढवणे.

(2) शेतीची नासाडी करणाऱ्या प्राण्यांची संख्या मर्यादित ठेवणे.

(3) पर्यावरण शृंखलेतील सर्वात वरच्या पायरीचा दुवा टिकवून, त्या परिणामी पर्यावरण संतुलित ठेवणे.

(4) जैववैविध्य टिकविणे.

---

**78.** सर्व विद्याशाखांमधील संशोधनास साहाय्य व प्रोत्साहन देण्यासाठी ________ ने संशोधन छात्रवृत्ती आणि शिक्षक छात्रवृत्तीची योजना सुरू केली.

(1) एन.सी.ई.आर.टी.　　(2) सी.ए.एस.ई.

(3) एन.सी.टी.ई.　　(4) यु.जी.सी.

---

**79.** तांत्रिक शिक्षण संचाळनाळयाचे प्रमुख ________ असतात.

(1) उच्च शिक्षण मंत्री　　(2) राज्य शिक्षण मंत्री

(3) तांत्रिक शिक्षण सचिव　　(4) तांत्रिक शिक्षण संचाळक

---

**80.** भारतात मोबाईल साहाय्याने कार्यात्मक साक्षरता शिक्षण उपक्रम राबवणे सहज शक्य आहे कारण ..........

(1) भौगोलिक मर्यादा ओलांडून संपर्क प्रस्थापित करणाऱ्या, पायाभूत यंत्रणा उच्च दर्जाच्या आहेत.

(2) अन्य खर्चिक अशा भौतिक स्वरूपाच्या, व्यक्तिगत सुविधांची गरज नाही.

(3) भारतीय लोकांचा स्व-भाषेतून, बोलण्या-ऐकण्यातून शिकण्याच्या परंपरेशी परिचय आहे.

(4) वरील सर्व.

---

**कच्च्या कामासाठी जागा**



www.StudentBounty.com

StudentBounty.com

**81.** नवजात बालकाची रोगप्रतिकारक शक्ति ____________ यामुळे वाढते.

(1) मध-पाणी (2) गाईचे दूध

(3) ग्लुकोज पाणी (4) आईच्या दुधातील चीक

**82.** कार्बोदकांच्या पचनाची सुरवात ____________ या इंद्रियापासून होते.

(1) पोट (2) लहान आतडे

(3) मूख पोकळी (4) मोठे आतडे

**83.** मधुमेह झालेल्या व्यक्तीच्या आहारात ____________ चे प्रमाण कमी असावे.

(1) तृणधान्यं (2) साखर

(3) कोंबडी (4) वरील सर्व

**84.** दूधाचे रूपांतर दही मध्ये करण्यासाठी ____________ चा वापर होतो.

(1) बुरशी (2) तृणाणू

(3) जिवाणू (4) खमीर

**85.** भारतामध्ये सार्वजनिक आहाराच्या दर्जात सुधारणा करणाऱ्या 'राष्ट्रीय पोषण संस्था' (N.I.N.) चे कार्यालय ____________ या शहरात आहे.

(1) मुंबई (2) दिल्ली

(3) नागपूर (4) हैद्राबाद

**86.** जीवनसत्व 'अ' ची कमतरता भरुन काढण्यासाठी मुलांच्या आहारांत प्रामुख्याने ____________ असावे.

(1) फळभाज्या (2) कंदमुळे

(3) साखर (4) हिरव्या पालेभाज्या व पिवळी फळे

**87.** एक ग्रॅम कर्बोदकांपासून सुमारे ____________ किलो कॅलरी (उष्मांक) कार्यशक्ति मिळते.

(1) तीन (2) चार

(3) पाच (4) नऊ

**88.** ____________ या योजनेमुळे शाळेच्या निगराणीत पालकांचा सहभाग वाढला.

(1) पोषक आहार (2) धान्य वाटप

(3) मध्यान्ह भोजन कार्यक्रम (4) सकस अन्न वाटप कार्यक्रम

**कच्च्या कामासाठी जागा**

www.StudentBounty.com

StudentBounty.com

**89.** जीवनसत्व ब 12 च्या कमतरतेने होणाऱ्या रक्तक्षयास __________ ॲनिमिया असे म्हणतात.
(1) मॅक्रोसायटिक (2) मेगॅलोब्लास्टिक
(3) पर्नीसियस (4) न्युट्रीशनल डेफिसियन्सी

**90.** अपत्याचे लिंग ________ कडून निश्चित होत असते.
(1) माता (2) पिता (3) आजी (4) आजोबा

**91.** पूर्वबाल्यावस्थेलचा ________ वय देखील म्हणतात.
(1) सामाजिकरणाचे (2) उत्सुकतेचे
(3) मैत्रीचे (4) टोळीपूर्व

**92.** पौगंडावस्थेतील शीघ्र वाढीळाच ________ म्हणतात.
(1) गुणात्मक वाढ (2) शारीरीक वाढ
(3) वाढ प्रकोप (4) बौद्धीक वाढ

**93.** सामान्यपणे निकृष्ट सामाजिक, आर्थिक स्तरातील मुळे ________ दुरुपयोगाला बळी पडतात.
(1) लैंगिक (2) भावनिक (3) शारीरीक (4) मानसिक

**94.** बाल्यावस्थेचा एकून कालखंड ________ आहे.
(1) 2 महिने ते 2 वर्षे (2) 6 ते 12 वर्षे
(3) 2 ते 12 वर्षे (4) 2 आठवडे ते 2 महिने

**95.** बालकामगारांसाठी कायदे करण्याचे धोरण ________ मध्ये ठरविण्यात आले.
(1) 1986 (2) 1987 (3) 1988 (4) 1989

**96.** अक्षानुवर्ती विकास __________ क्रमाने होतो.
(1) डोक्याकडून पायाकडे (2) शरीराच्या मध्यापासून दोन्हीबाजूकडे
(3) पायाकडून डोक्याकडे (4) शरीराच्या दोन्ही बाजूकडून मध्याकडे

**97.** अपंग मुळाना __________ असेही संबोधले जाते.
(1) सदोष मुले (2) विपरित मुले
(3) आव्हानात्मक मुले (4) समस्याग्रस्त मुले

**कच्च्या कामासाठी जागा**



www.StudentBounty.com

StudentBounty.com

**98.** __________ ही शिस्त मुलांच्या जीवनात सकारात्मक बदल घडविते.

(1) अधिकारपूर्ण शिस्त (2) अतिलोकळीक
(3) लोकशाही शिस्त (4) सौम्य शिस्त

**99.** __________ ही बाळकाच्या सामाजिक जीवनाची सुरवात होय.

(1) सामाजिक खेळ (2) बाळकाचे हास्य
(3) नजर येणे (4) मान सावरणे

**100.** __________ हे वर्ष 'आंतरराष्ट्रीय बाळक वर्ष' जाहिर करण्यात आले होते.

(1) 1995 (2) 1979 (3) 1970 (4) 1983

**101.** ________ ही व्यक्तीचे व्यक्तिमत्व घडविण्याची महत्वाची प्रक्रिया आहे.

(1) सामाजिक नियंत्रण (2) सामाजिकरण
(3) मानवीसंपर्क (4) भाषा

**102.** स्वभाव व परिस्थिती या दोहोंच्या आंतरक्रियेतून __________ घडत असते.

(1) जीवनशैली (2) व्यक्तिमत्व
(3) प्रगल्भता (4) सामाजिकरण

**103.** संसदेत व विधी मंडळात महिलांसाठी 33% आरक्षणाचे विधेयक संसदेत एकमत न झाल्यामुळे ________ साली भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या तत्कालीन खासदार कॉ. गीता मुखर्जी यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन झालेल्या संसदेच्या विशेष संयुक्त समितीकडे सोपवण्यात आले होते.

(1) 1992 (2) 1994 (3) 1996 (4) 1998

**104.** सामाजिक समस्यांचा संबंध मानवाच्या ________ जीवनाशी असतो.

(1) धकाधकीच्या (2) सार्वजनिक
(3) सर्वसामान्य (4) दैनंदिन

**105.** कामाच्या ठिकाणी महिलांवर होणाऱ्या लैंगिक अत्याचारांना आळा घालण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाने कोणत्या प्रकरणात सविस्तर मार्गदर्शक सूत्रे व नियम नमूद केले आहेत ?

(1) विशाखा (2) शहाबानो
(3) मथुरा (4) भैरवीदेवी

**कच्च्या कामासाठी जागा**

www.StudentBounty.com

StudentBounty.com

**106.** सह्याद्री पर्वताच्या परिसरात ________ जमाती आहेत.

(1) गोंड, कोल, कमाट आणि कोल (2) वारली, कातकरी, महादेवकोळी आणि भिल्ल

(3) तोडा, कोटा, कहुर आणि कुरूंबा (4) डाफला, भोटिया, थारू आणि खासी

---

**107.** राष्ट्रीय महिला आयोगाच्या ताज्या अहवालानुसार भारतातील ________ वयोगटातील 2·4% महिला या वेश्याव्यवसायात अडकल्या गेल्या आहेत.

(1) 13 ते 18 (2) 20 ते 30 (3) 40 ते 50 (4) 15 ते 35

---

**108.** राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदा ________ साली अस्तित्वात आला.

(1) 2006 (2) 2005 (3) 2008 (4) 2009

---

**109.** ________ वर्षे या वयोगटातील निराश्रित, परित्यक्ता, कुमारीमाता, बलात्कारित अथवा संकटग्रस्त महिलांना आश्रय देवून त्यांचे पूनर्वसन करण्यासाठी शासकीय महिला राज्य गृहे स्थापन करण्यात आळी आहेत.

(1) 18 ते 40 (2) 21 ते 35 (3) 25 ते 45 (4) 28 ते 40

---

**110.** 4 ऑगस्ट 2009 रोजी संसदेने मंजूरी दिलेल्या सक्तीच्या व मोफत प्राथमिक शिक्षणाच्या कायद्यान्वये ________ वर्षापर्यंतच्या मुला मुलींना मोफत व सक्तीचे प्राथमिक शिक्षण देण्याची तरतूद आहे.

(1) 0 ते 14 (2) 6 ते 14 (3) 0 ते 18 (4) 3 ते 14

---

**111.** 'महात्मा गांधी तंटामुक्त गाव मोहीमे' अन्तर्गत 2008 च्या मुल्यमापनानुसार तंटामुक्तीमध्ये आघाडीवर असलेल जिल्हा.

(1) पुणे (2) रायगड (3) नंदुरबार (4) लातूर

---

**112.** 'राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदा' (एन.आर.ई.जी.) कोणत्या दिवसापासून अंमलात आला ?

(1) 01 एप्रिल 2006 (2) 02 फेब्रुवारी 2006

(3) 26 जानेवारी 2006 (4) 15 ऑगष्ट 2006

---

**113.** भारतीय वंशाचे डॉ व्यंकटरमण रामकृष्णन यांना 2009 मध्ये ________ या विषयातील संशोधनासाठी नोबेल पारितोषिक प्राप्त झाले.

(1) साहित्य (2) भौतिकशास्त्र

(3) रसायनशास्त्र (4) वैद्यकशास्त्र

---

**कच्च्या कामासाठी जागा**

P.T.O.

www.StudentBounty.com

StudentBounty.com

**114.** विद्यापीठे व महाविद्यालये यांचे गुणात्मक मूल्यांकन करणारी संस्था कोणती ?

(1) नॅक (2) यू.जी.सी.

(3) मनुष्यबळ विकास मंत्रालय (4) उच्च शिक्षण विभाग

---

**115.** 'निर्मल ग्राम' पुरस्कार __________ च्या वतीने दिला जातो.

(1) जिल्हा परिषद (2) केंद्र सरकार

(3) राज्य सरकार (4) यापैकी कोणी नाही

---

**116.** महाराष्ट्रातील पोलीस कंमाडो विशेष पथकास __________ या नावाने ओळखतात.

(1) एन.एस.जी. (2) फोर्स वन

(3) राज्य सुरक्षा दल (4) राज्य राखीव व विशेष सुरक्षा दल

---

**117.** 'महाराष्ट्र भूषण 2009' पुरस्कार __________ यांना मिळाला.

(1) ना.धो. महानोर (2) सुलोचना

(3) सिंधूताई अंबिये (4) किशोरी आमोणकर

---

**118.** 'नटरंग' या कांदबरीचे लेखक कोण आहेत ?

(1) द.भि. कुळकर्णी (2) सदानंद देशमुख

(3) डॉ. आनंद यादव (4) प्रल्हाद लुळेकर

---

**119.** भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांची नियुक्ती कोण करतात ?

(1) अर्थमंत्री (2) राष्ट्रपती (3) पंतप्रधान (4) यापैकी कोणी नाही

---

**120.** महाराष्ट्र आपल्या स्थापनेचा सुवर्णमहोत्सव साजरा करीत आहे. संयुक्त महाराष्ट्र चळवळीच्या काळात 'आग ओकणारी तोफ' म्हणून कोणाचा उल्लेख केला जात असे ?

(1) आचार्य प्र.के. अत्रे (2) यशवंतराव चव्हाण

(3) आचार्य शंकरराव देव (4) नानासाहेब परूळेकर

---

**121.** यापैकी कुठल्या भारतीय वंशाच्या लेखकास बुकर पुरस्काराने सन्मानित करण्यात आलेले नाही ?

(1) किरण देसाई (2) अरविंद अडिगा

(3) विक्रम सेठ (4) अरूंधती रॉय

---

**कच्च्या कामासाठी जागा**

www.StudentBounty.com

StudentBounty.com

**122.** 2009 सालासाठीच्या दादासाहेब फाळके पुरस्काराने सन्मानित श्री व्ही.के. मूर्ती हे प्रसिद्ध ________ आहे.

(1) दिग्दर्शक (2) छाया दिग्दर्शक

(3) संगीत दिग्दर्शक (4) कळा दिग्दर्शक

---

**123.** दिवंगत मार्क्सवादी नेते ज्योती बसू हे कोणत्या राज्याचे मुख्यमंत्री होते ?

(1) त्रिपूरा (2) ओरिसा (3) प. बंगाल (4) केरळ

---

**124.** 83व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष स्थान कोणी भूषविले ?

(1) मंगेश पाडगावकर (2) द.भि. कुळकर्णी

(3) प्रेमानंद गज्वी (4) गंगाधर पानतावणे

---

**125.** बॅ. जिन्ना यांच्यावर पुस्तक लिहिल्या बद्दल __________ यांना भाजपाचे सदस्यत्व गमवावे लागले होते.

(1) जसवंत सिंह (2) यशवंत सिन्हा

(3) राजनाथ सिंह (4) गोपिनाथ मुंढे

---

**126.** हरित क्रांतीचे जनक नॉर्मन बोरलॉग यांचा वयाच्या 94व्या वर्षी __________ या महिन्यात मृत्यू झाला.

(1) सप्टेंबर 2009 (2) ऑक्टोबर 2009

(3) सप्टेंबर 2008 (4) जुलै 2009

---

**127.** खालीलपैकी भारतात सर्वाधिक पवन उर्जा निर्माण करणारे राज्य कोणते ?

(1) तामिलनाडू (2) मध्य प्रदेश

(3) उत्तर प्रदेश (4) आंध्र प्रदेश

---

**128.** भारतात __________ या राज्यात सर्वाधिक 'सेझ' (SEZ) प्रकल्प आहेत.

(1) तामिलनाडू (2) महाराष्ट्र

(3) कर्नाटक (4) यापैकी कोणी नाही

---

**कच्च्या कामासाठी जागा**

P.T.O.

www.StudentBounty.com

StudentBounty.com

**129.** चार्ल्स डॉर्विनच्या 'द ओरीजीन ऑफ स्पेसीज' (The Origin of Species) या ग्रंथाने _________ पूर्ण केली.

(1) 100 वर्षे (2) 200 वर्षे (3) 150 वर्षे (4) यापैकी कोणी

**130.** पंधराव्या लोकसभेत किती महिला सदस्य निवडून आल्या ?

(1) 58 (2) 69

(3) 60 (4) 59

**131.** 12 दिवसात 10 मजूर जेवढे काम करतात तेवढेच काम 8 मजूर किती दिवसात करतील ?

(1) 16 (2) 15 (3) 12 (4) 14

**132.** देश : NET : : राज्य : ?

(1) UGC (2) MPSC (3) SET (4) MSCIT


**133.** राम हा शाम पेक्षा वयाने मोठा पण नंदू पेक्षा लहान आहे. नंदू हा चंदू पेक्षा लहान आहे. रवी हा शाम पेक्षा मोठा पण राम पेक्षा लहान आहे. शाम हा अरूण पेक्षा मोठा आहे. व अरूण हा श्रीकांत पेक्षा मोठा आहे. तर सर्वांना चढत्या वयाप्रमाणे उभे राहण्यास सांगितल्यास मधोमध कोण असेल ?

(1) नंदू (2) राम (3) शाम (4) रवी

**134.** विसंगती ओळखा.

| (1) | (2) | (3) | (4) |
|---|---|---|---|
| + + + +<br>× × × × | − − − −<br>÷ ÷ ÷ ÷ | + × + ×<br>× + × + | + + + +<br>− − − − |

**135.** खालीलपैकी कोणत्या आकृतीद्वारे महाराष्ट्र, गुजरात, मुंबई यांच्यातील संबंध व्यक्त होतो ?



(1) (2) (3) (4)

कच्च्या कामासाठी जागा

www.StudentBounty.com

StudentBounty.com



**136.** पुढील संख्या श्रेणीतील क्रमाने येणारी संख्या शोधा.

13, 17, 21, 25, ______

(1) 27 (2) 28 (3) 29 (4) 30

---


**137.** जर पाणी म्हणजे झाड, झाड म्हणजे आकाश, आकाश म्हणजे समुद्र, समुद्र म्हणजे ढग, आणि ढग म्हणजे रस्ता तर विमान कोठे उडेल ?


(1) समुद्र (2) ढग

(3) आकाश (4) पाणी

---

**138.** आकृती A आणि B मध्ये जो संबंध आहे तोच संबंध आकृती C आणि D मध्ये निर्माण होण्यासाठी प्रश्नार्थक चिन्हाच्या ठिकाणी कोणती आकृती असावी ?




(1) (2) (3) (4)

---

**139.** पहिल्या दोन आकृती प्रमाणेच तिसऱ्या आकृतीशी संबंध असणारी आकृती शोधा ?






(1) (2) (3) (4)

---


**कच्च्या कामासाठी जागा**

P.T.O.

www.StudentBounty.com

StudentBounty.com

**140.** पुढील आकृतीतील काट कोनांची संख्या शोधा.



(1) 8 (2) 16 (3) 32 (4) 36

---

**141.** एका सांकेतिक भाषेत 'समाज सेवा' हा शब्द 13579, 'देवलोक' हा शब्द 2468 या अकांनी दाखविला जातो, तर 'लोक सेवा' या शब्दासाठी कोणते अंक वापराल ?

(1) 8796 (2) 6579 (3) 6879 (4) 4697

---

**142.** 2010 या वर्षी 1 जानेवारी रोजी शुक्रवार होता तर वर्षभरात एकूण किती शुक्रवार येतील ?

(1) 53
(2) 52
(3) 51
(4) 1, 2, 3 पैकी नाही

---

**143.** जर 6 ✳ 5 △ 2 = 28
तर 26 △ 2 ✳ 5 = ?

(1) 18 (2) 16 (3) 36 (4) 20

---

**144.** पुढील श्रेणी पूर्ण करणारी संख्या शोधा.

2, 5, 4, 10, 6, 15, 8, _______

(1) 17 (2) 18 (3) 19 (4) 20

---

**145.** पुढील घटकांसाठी योग्य आकृतीची निवड करा.

सुर्यमाला, पृथ्वी, पर्यावरण



(1) (2) (3) (4)

---

**146.** एका रांगेत 4 मीटर अंतरावर एक मुळगा या प्रमाणे 40 मुळगे उभे केले तर 7 व 27 क्रमांकांच्या मुलांमधील अंतर किती ?

(1) 60 मी. (2) 70 मी. (3) 80 मी. (4) 90 मी.

---

**कच्च्या कामासाठी जागा**

StudentBounty.com




**147.** पुढील संख्या श्रेणीतील क्रमाने येणारी संख्या कोणती ?


3, 6, 11, 18, _______

(1) 19 (2) 27 (3) 26 (4) 29


---

**148.** पुढील आकृतीत प्रश्नार्थक चिन्हाच्या ठिकाणी कोणती आकृती येईल ?







(1)



(2)



(3)



(4)

---


**149.** एका सांकेतिक लिपित ARUN, 2192215 असे लिहिले जाते तर ANIL, 2151013 असे लिहिले जाते. त्याच लिपित ASHOK कसे लिहिता येईल ?


(1) 21981511 (2) 22091612

(3) 21991612 (4) 22081511


---

**150.** खालील आकृतीचे पाण्यातील प्रतिबिंब कसे दिसेल ? अचूक पर्याय शोधा.







(1)



(2)



(3)



(4)

---

**कच्च्या कामासाठी जागा**

www.StudentBounty.com

StudentBounty.com

## सूचना - (पृष्ठ 1 वरुन पुढे....)

(8) प्रश्नपुस्तिकेमध्ये विहित केलेल्या विशिष्ट जागीच कच्चे काम (रफ वर्क) करावे. प्रश्नपुस्तिकेव्यतिरिक्त उत्तरपत्रिकेवर वा इतर कागदावर कच्चे काम केल्यास ते कॉपी करण्याच्या उद्देशाने केले आहे, असे मानले जाईल व त्यानुसार उमेदवारावर शासनाने जारी केलेल्या "परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारांना प्रतिबंध करण्याबाबतचे अधिनियम-82" यातील तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती कमाल एक वर्षाच्या कारावासाच्या आणि/किंवा रुपये एक हजार रकमेच्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.

(9) सदर प्रश्नपत्रिकेसाठी आयोगाने विहित केलेली वेळ संपल्यानंतर उमेदवाराला ही प्रश्नपुस्तिका स्वतः बरोबर परीक्षाकक्षाबाहेर घेऊन जाण्यास परवानगी आहे. **मात्र परीक्षाकक्षाबाहेर जाण्यापूर्वी उमेदवाराने आपल्या उत्तरपत्रिकेचा भाग-1 समवेक्षकाकडे न विसरता परत करणे आवश्यक आहे.**

---

## नमुना प्रश्न

प्रश्न क्र. **101.** आधुनिक विचारसरणीनुसार शिक्षणाच्या प्रक्रियेतील केंद्रबिंदु कोण ?

(1) शिक्षण संस्था (2) शिक्षक

(3) विद्यार्थी (4) अभ्यासक्रम

ह्या प्रश्नाचे योग्य उत्तर "(3) विद्यार्थी" असे आहे. त्यामुळे या प्रश्नाचे उत्तर "(3)" होईल. यास्तव **खालीलप्रमाणे** प्र.क्र. **101** समोरील उत्तर-क्रमांक "③" हे वर्तुळ पूर्णपणे छायांकित करून दाखविणे आवश्यक आहे.

प्र.क्र. **101.** ① ② ● ④

अशा पद्धतीने प्रस्तुत प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाचा तुमचा उत्तरक्रमांक हा तुम्हाला स्वतंत्ररीत्या पुरविलेल्या उत्तरपत्रिकेवरील त्या त्या प्रश्नक्रमांकासमोरील संबंधित वर्तुळ पूर्णपणे छायांकित करून दाखवावा. **ह्याकरिता फक्त काळ्या शाईचे बॉलपेन वापरावे, पेन्सिल वा शाईचे पेन वापरू नये.**

---

**कच्च्या कामासाठी जागा**

www.StudentBounty.com